

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ७ अंक : ४

आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४३
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२१

---

संपादक : श्री. भीमसेनराव माड्यालकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

---

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- प्रशासकीय क्षेत्रातील मराठी आत्मचरित्रांचा प्रवाह : एक दृष्टिक्षेप / प्रा. समाधान काशिराम सातव ७
- ब्रिटिश राज आणि वडार मजूर : अज्ञात इतिहास / डॉ. जगन्नाथ सावंत १५
- लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांची लोकगीते : साताऱ्याची अस्सल ग्रामगीते / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात २३
- रवींद्र शोभणे यांच्या कथेतील युवादर्शन / प्रा. काशीनाथ तरासे ३९
- देवमाणूस कै. शशिकांत रास्ते / उषा रास्ते ४७
- कीर्तिरूपे 'शेष'/ प्रा. डॉ. सुहास पुजारी ५९
- प्रतिभावंत दिग्दर्शक अकिरा कुरोसावा / सर्वोत्तम सताळकर ७१
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ७९
- श्री हनुमान जयंत / मीनाक्षी बक्षी ८२
- सायबर सुरक्षा काळाची गरज – एक अंतर्दृष्टी / डॉ. अनंत दत्तात्रय चिंचुरे ८८
- मनात घर करणारे पुस्तक : 'मनीमानसी' / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ९४



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# प्रशासकीय क्षेत्रातील मराठी आत्मचरित्रांचा प्रवाह : एक दृष्टिक्षेप

● प्रा. समाधान काशिराम सातव

इंग्रज राजवट सुरू झाल्यापासून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात जसे बदल झाले, तसेच साहित्याच्या क्षेत्रातही बदल झाल्याचे दिसून येतात. मराठी साहित्याचा विचार करता इंग्रज राजवटी पूर्वीचे मराठी साहित्य हे प्रामुख्याने पद्य स्वरूपामध्ये होते. इंग्रज राजवटीमुळे साहित्य आणि संस्कृतीचे आदान-प्रदान होऊ लागले, त्यातूनच मराठी साहित्यात कादंबरी, निबंध, चरित्र इ. साहित्य प्रकारांची भर पडू लागली. त्यांपैकीच एक साहित्यप्रकार म्हणजे आत्मचरित्र होय.

**आत्मचरित्र : संकल्पना व स्वरूप**

आत्मचरित्र हा साहित्यप्रकार सर्वात सोपा आणि सर्वात कठीण असा साहित्यप्रकार आहे. लेखक आपल्या स्वतःची जीवन कहाणी स्वतःच्या शब्दांत सांगत असतो, हे सांगणे जसे सोपे आहे तसेच अवघडसुद्धा आहे. सर्वात सोपा म्हटले, कारण आत्मचरित्र कुणीही लिहू शकतो. सामान्य मनुष्याच्या जीवनामध्ये कल्पनेपेक्षाही अद्भूत अशा घटना घडत असतात आणि या घटनांचे वर्णन करून आत्मचरित्रकार आत्मचरित्र लिहीत असतो. कथा, कादंबरी, कविता, नाटक लिहिण्यासाठी जी प्रतिभा असावी लागते, ती आत्मचरित्र लिहिताना लागतेच असे नाही. थोडक्यात आत्मचरित्र फक्त साहित्याच्या क्षेत्रातीलच व्यक्ती लिहू शकते असे नाही तर कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती आत्मचरित्र सहजपणे लिहू शकते. त्यामुळे आत्मचरीत्र लिहिणे हा सोपा साहित्यप्रकार आहे. असे असले तरी आत्मचरित्र लिहिणे हे अवघडसुद्धा आहे, कारण ज्या वेळी लेखक आत्मचरित्र लिहायला सुरुवात करतो, त्यावेळी प्रत्येक घटना-प्रसंग नोंदवताना तो स्वतःला काही प्रश्न विचारत असतो. आत्मचरित्रामध्ये काय सांगायचे ? कसे सांगायचे ? कोणाविषयी सांगायचे ? का सांगायचे ? असे असंख्य प्रश्न त्याच्यापुढे उभे

Govt. College of Arts & Science Aurangabad



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

राहतात, त्यातून तो घटना-प्रसंगांची निवड करून मांडणी करत असतो. त्यामुळे सर्वात सोपा आणि सर्वात कठीण आत्मचरित्र हा साहित्यप्रकार आहे. याशिवाय पुढील व्याख्यांवरून आत्मचरित्राची संकल्पना स्पष्ट होते

'ऑटोबायोग्रफी' या इंग्रजी संज्ञेला पर्यायी संज्ञा म्हणून मराठीत 'आत्मचरित्र' किंवा 'आत्मकथा' ही संज्ञा वापरली जाते.[१]

'आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखन रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय.' रा. ग. जाधव.[२]

याशिवायही अनेक अभ्यासकांनी आत्मचरित्राच्या विविध व्याख्या सांगितलेल्या आहेत. आत्मचरित्र हे एक प्रकारचे स्वतःचेच स्वतः लिहिलेले चरित्र असते. लेखक आत्मचरित्रामध्ये स्वतःच्या जीवनाचे तटस्थपणे निरीक्षण करून स्वचरित्राची रचना करत असतो. या स्वचरित्रातून तो आपल्या जीवनाच्या वाटचालीचा आलेख नोंदवत असतो. त्यातून आत्मचरित्र आकारास येते. आत्मचरित्र लिहिताना सत्यकथन, तटस्थवृत्ती, घटनांची योग्य निवड आणि वस्तुस्थितीचे सादरीकरण या आत्मचरित्राच्या प्रमुख अंगांचा विचार केला जातो. यावर आत्मचरित्राची यशस्विता अवलंबून असते. आत्मचरित्र लिहीत असताना आत्मचरित्रकार विशिष्ट हेतू समोर ठेवून आत्मचरित्र लिहीत असतो. आपल्या जीवनातील घडलेले अनुभव इतरांना सांगावे, गतजीवनातील अनुभवांचे सिंहावलोकन करणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे, अशा विविध हेतूंनी आत्मचरित्राचे लेखन होत असते; परंतु या मागे विशिष्ट अशी प्रेरणा असते. आत्मचरित्र लेखनाच्या आत्माविष्कार, आत्मप्रतिमा, आत्मपरीक्षण, आत्मप्रेम, आत्मशोध अशा असंख्य प्रेरणा आत्मचरित्र लेखनाच्या मुळाशी असतात. आत्मचरित्र लिहिताना यांपैकी जी प्रेरणा आत्मचरित्राच्या मुळाशी असेल त्यानुसार आत्मचरित्राला वळण प्राप्त होत असते.

**आत्मचरित्र : एक स्वतंत्र साहित्यप्रकार**

आत्मचरित्र हा साहित्य प्रकार इंग्रज राजवटीनंतर मराठी साहित्यात आलेला साहित्यप्रकार आहे; परंतु असे असले तरी मराठीतील आत्मचरित्र लेखनाच्या पाऊलखुणा या संतसाहित्यामध्ये दिसून येतात. आत्मचरित्र हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून संतसाहित्यात दिसून येत नसला तरी आत्मनिवेदनपर लेखन



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

संतसाहित्यात भरपूर प्रमाणात दिसून येते. याबाबत वसंत बोरगावकर म्हणतात, 'भक्तिभाव व्यक्त करावेत, आत्मोद्धाराची तळमळ व्यक्त करावी, परमेश्वराविषयीच्या भेटीचे आर्त उत्कट शब्दांत व्यक्त करावे, परमेश्वराच्या मनातील भक्ताविषयीची वात्सल्यभावना अनुभवावी व ती शब्दांकित करावी, आत्मस्वरूपाची जाणीव व्यक्त करावी, जनसामान्यांना उपदेश करावा, अशा विविध प्रेरणांतून आत्मनिवेदनपर अभंगरचना करण्यात आली आहे.'[३] यावरून आत्मचरित्र हा स्वतंत्र साहित्यप्रकार इंग्रज राजवटीनंतर आलेला असला तरी त्याच्या पाऊलखुणा मध्ययुगीन साहित्यापासून दिसून येतात. मध्ययुगीन कालखंडात मराठीमध्ये संत नामदेव, संत जनाबाई, संत तुकाराम इत्यादि संतांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून आत्मनिवेदनपर अभंग लिहिलेले आहेत. यानंतर १७६१च्या दरम्यान नाना फडणवीस यांनी आत्मचरित्र लिहिले आणि मराठी साहित्यात आत्मचरित्र लेखनास सुरुवात झाली. त्यानंतर १८६८ मध्ये दादोबा पांडुरंग यांचे आत्मचरित्र, १८८८ मध्ये बाबा पद्मनजी यांचे अरुणोदय उर्फ स्वलिखित चरित्र, धोंडो केशव कर्वे यांचे आत्मवृत्त अशी अनेक आत्मचरित्रे प्रारंभीच्या काळामध्ये समोर आली. त्यामुळे आत्मचरित्र हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून मराठी साहित्यात अस्तित्वात आला.

## आत्मचरित्र लेखनाचे विविध प्रवाह

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर शिक्षणाचे क्षेत्र सर्वसामान्यांसाठी खुले झाले. त्याचप्रमाणे औद्योगिकरणामुळे आणि दळणवळणाच्या साधनांमुळे विविध कार्यक्षेत्रे उदयास आली. आपापल्या कार्यक्षेत्रात शून्यातून विश्व निर्माण करण्याची संधी प्राप्त होऊ लागली, त्यात कधी संघर्ष तर कधी यशापयश येऊ लागले, म्हणून आपण या संघर्षातून कसे यश प्राप्त केले, आपली यशोगाथा सर्वसामान्यांना माहिती व्हावी, त्यातून त्यांना दिशा मिळावी या हेतूने आत्मचरित्रे लिहिली जाऊ लागली. त्यामुळे मराठीत आत्मचरित्र लेखन विपुल प्रमाणामध्ये होऊ लागले. प्रामुख्याने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला आत्मचरित्र लेखनाचे विविध प्रवाह समोर आल्याचे दिसून येते. याबाबत उषा हस्तक म्हणतात, 'विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आत्मचरित्रपर लेखनाच्या दृष्टीने अतिशय प्रेरक, पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे स्त्रिया आणि दलित यांच्याखेरीज इतरही अनेक व्यक्तींनी आत्मचरित्रपर लेखन केलेले आहे. व्यक्ती



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

छोटी असो वा मोठी, सामान्य असो वा असामान्य, प्रसिद्ध असो वा अप्रसिद्ध ती आता विनासंकोच आत्मचरित्रपर लेखनासाठी प्रवृत्त होऊ लागलेली आहे. त्यामुळे जीवनाचे कचितच एखादे क्षेत्र अशा लेखनापासून दुरावलेले राहिले असेल.'[४] यावरून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक, वैद्यकीय या विशिष्ट क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीने आत्मचरित्र लिहिण्यास सुरुवात केली. त्यामुळे विविध कार्यक्षेत्रातील आत्मचरित्रांचे विविध प्रवाह समोर आले. शिक्षणाची ज्ञानगंगा खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली. त्यातून ग्रामीण भागातील तरुण नोकरीच्या संधी शोधू लागला, त्यातून प्रशासकीय नोकरीचे क्षेत्र प्राप्त करू लागला. गोरगरीब-कष्टकऱ्याचा मुलगा हा जिल्हाधिकारी होऊ शकतो, याची जाणीव सर्वसामान्यांना होऊ लागली. त्यातून ही मुले मोठ्या पदावर जाऊ लागली आणि आपली यशोगाथा आत्मचरित्राच्या माध्यमातून सांगू लागली. त्यातूनच प्रशासकीय आत्मचरित्र लेखनाचा प्रवाह निर्माण झाला आहे.

**प्रशासकीय क्षेत्रातील आत्मचरित्रे**

देशाच्या आणि राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या सेवेचे क्षेत्र म्हणून प्रशासकीय सेवेच्या क्षेत्राकडे बघितले जाते. प्रशासक हा भारतीय व्यवस्थेचा कणा असतो, तसेच शासन आणि जनता यांच्या मध्यस्थाची महत्त्वपूर्ण भूमिका प्रशासकाला पार पाडावी लागते. प्रशासकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र हे खूप व्यापक असते. लोकप्रतिनिधीपेक्षा प्रशासक वेगळा ठरतो, कारण लोकप्रतिनिधींचा कार्यकाल ठराविक कालावधीतच असतो; परंतु प्रशासक निवृत्तीपर्यंत आपल्या पदावर काम करत असतो. विविध सरकारी योजनांची अंमलबजावणी करणारा प्रशासकच असतो. अशावेळी त्याला विविध प्रसंगांना सामोरे जावे लागते. कधीकधी लोकप्रतिनिधींच्या दबावतंत्राचा वापर होतो. कोणी सामोरे जातो तर कोणी निभावून घेतो. ग्रामीण आणि शहरी जीवनाचा जवळून अभ्यास असलेला प्रशासक असतो. देशाच्या आणि राज्याच्या विकासात व जडणघडणीमध्ये प्रशासकाचा महत्त्वाचा वाटा असतो. काही वेळा राजकीय नेत्यांशी वैर तर काहीवेळा सलोखा असतो. प्रशासक म्हणून काम पाहताना सामाजिक बांधिलकी जोपासावी लागते. कामगार, शेतकरी, दलित, आदिवासी इ. लोकांसाठी योजनांची अंमलबजावणी करावी लागते. विविध संप, आंदोलने यांना सामोरे जावे लागते. कधीकधी भ्रष्टाचाराचे आरोप-प्रत्यारोप होतात. प्रशासक

Govt. College of Arts & Science Aurangabad.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

म्हणून कठोर निर्णय घ्यावे लागतात. या निर्णयाचा पुढील अनेक पिढ्यांवर परिणाम होत असतो. कधीकधी प्रशासकाच्या एखाद्या चुकीमुळे संपूर्ण व्यवस्था दोषी ठरू शकते. आपल्या आयुष्यातील वीस-तीस वर्षांची सेवा करताना एकप्रकारे तारेवरची कसरत प्रशासकांना करावी लागते. अशा वेळी अनेक वळणं येतात. काही अधिकारी प्रवाहानुसार त्यामध्ये सहभागी होतात, तर काही आपल्या नैतिकतेवर ठाम राहून आपली कणखर भूमिका कायम ठेवतात. अशा वागण्यामुळे काही वेळा वारंवार बदल्या होतात, असा प्रशासक काहींना नकोसा होतो.

अशा प्रचंड अनुभवाची शिदोरी प्रशासकीय अधिकाऱ्याकडे असते; परंतु ते उघडपणे बोलता येत नाही. प्रशासनात काम करत असताना बंधने असतात. व्यवस्थेच्या बाहेर जाऊन बोलता येत नाही. काम करता येत नाही. काही विरोधात बोलल्यास अनेक चौकशीला, समितीला सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रशासनामध्ये अडचणी निर्माण होतात. अशा सर्व बंधनात राहूनही काही अधिकारी धाडस करून आत्मचरित्र लेखनाकडे वळलेले दिसून येतात; परंतु यामध्ये प्रामुख्याने, एक तर नुकतेच प्रशासकीय पदावर आल्यानंतर आपण या पदावर कसे पोहोचलो हे सांगणाऱ्या नवागत अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्राचा प्रवाह दिसून येतो. दुसरा निवृत्तीनंतर आत्मचरित्र लिहिण्याचा प्रयत्न केल्याचा प्रवाह दिसून येतो. प्रशासकीय क्षेत्रातील व्यक्तींनी आत्मचरित्र लिहिणे हे एक प्रकारचे अग्निदिव्य असते. अशा आत्मचरित्रातून व्यवस्थेतील मुळाशी हात लावणे असते. हे धाडस सहजासहजी कोणी स्वीकारत नाही; पण असे असले तरी बऱ्याच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आत्मचरित्रे लिहिलेली दिसून येतात.

शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचली, त्यातून ग्रामीण भागातील तरुणांना आपल्या क्षमतांची जाणीव झाली. रोजगार हमीवर काम करणारा मजूर, शेतकरी, आदिवासी, दलित समाजातील तरुण मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षेकडे वळला. त्यातून संघर्ष करून अनेक तरुण प्रशासकीय पदावर पोहोचले. त्यामुळे आपण केलेला संघर्ष कुणाला तरी सांगावा, आपल्या पावलावर पाऊल ठेवून आपल्या समाजातील मुलंही प्रशासनात यावी, त्यांना दिशा मिळावी या हेतूनेही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आत्मचरित्रे लिहिलेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने विष्णू औटी यांचे 'नाना, मी साहेब झालो', राजेश पाटील यांचे 'ताई, मी कलेक्टर व्हयनू', डॉ. राजेंद्र भारूड यांचे 'मी एक स्वप्न पाहिलं', रमेश



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

घोलप यांचे 'इथे थांबणे नाही', भरत आंधळे यांचे 'गरुडझेप - एक ध्येयवेडा प्रवास' इ. तरुणांनी आत्मचरित्रं लिहून आपल्या संघर्षाची कथा मांडली आहे. ही आत्मचरित्रे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांना मार्गदर्शक ठरणारी आहेत. 'ताई मी कलेक्टर व्हयनू' या आत्मचरित्राबाबत डॉ. नरेंद्र जाधव म्हणतात, 'राजेश पाटील या आत्मकथनाचा नायक असला, तरी तो असंख्य अभावग्रस्त तरुणांच्या समूहाचा प्रतिनिधी म्हणून समोर येतो. सामान्य वाटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये एक अंगभूत गुणवत्ता असते. त्या गुणवत्तेचा शोध घेऊन अथकपणे वाटचाल केली तर कर्तृत्वाची शिखरे साद घालतात. आव्हानांना सामोरे जाऊनच आपली मुद्रा उमटवता येते. हे वास्तव या आत्मकथनातून अधोरेखित झाले आहे.'[५] यावरून प्रशासकीय क्षेत्रातील नवागत अधिकाऱ्यांच्या आत्मचरित्रातून प्रशासकीय पदांपर्यंत पोहोचलेल्या तरुणांचा संघर्ष दिसून येतो.

याशिवाय काही ज्येष्ठ अधिकाऱ्यांनीही निवृत्तीनंतर आपला संघर्ष आणि प्रशासनातील अनुभव आत्मचरित्राच्या माध्यमातून मांडला आहे. त्यामधील आत्मचरित्रे प्रमुख्याने निवृत्तीनंतरच लिहिलेली आहेत. यामध्ये परिपूर्ण असे आत्मचरित्र आणि ज्यांची ओळख एक इतिहासकार आणि एक साहित्यिक म्हणून आहे, असे सेतुमाधवराव पगडी यांचे 'जीवनसेतु', राम प्रधान यांचे 'माझी वाटचाल - मेट्कॉफ हाऊस ते राजभवन', भुजंगराव कुलकर्णी यांचे 'मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र', आ. ना. होगे पाटील यांचे 'एका सनदी अधिकाऱ्याचा प्रशासननामा', ई. झेड. खोब्रागडे यांचे 'आणखी एक पाऊल', ज्ञानेश्वर मुळे यांचे 'माती, पंख आणि आकाश' गो. रा. खैरनार यांचे 'एकाकी झुंज', याशिवाय एकमेव महिला अधिकाऱ्याचे असावे असे, संगीता धायगुडे यांचे 'हुमान' हे आत्मचरित्र आहे. अशा प्रमुख प्रशासकीय क्षेत्रातील आत्मचरित्रांचा उल्लेख करता येतो. भुजंगराव कुलकर्णी यांच्या 'मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र' या आत्मचरित्राबाबत प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, 'उच्चपदस्थ सनदी सेवेची उच्च मूल्ये आपल्या कर्तबगार कारकिर्दीत त्यांनी संयमाने जपली, हे या आत्मचरित्रकाराचे योगदान आजच्या नोकरशाहीला निश्चितच अंधारातील दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरेल.'[६] यावरून या क्षेत्रातील आत्मचरित्रे ही आजच्या नोकरशाही व्यवस्थेला दिशादर्शक ठरणारी आहेत. प्रशासनात काम करत असताना कित्येकदा ऐतिहासिक स्वरूपाची कामगिरी हे प्रशासक करत असतात, त्याचा अनुभव आत्मचरित्रातून आल्यामुळे



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ही आत्मचरित्रे इतर आत्मचरित्रांपेक्षा वेगळी ठरतात. याबाबत राम प्रधान यांच्या आत्मचरित्राबाबत प्रभाकर करंदीकर म्हणतात, 'राज्यात आणि केंद्रात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना भिवंडीची दंगल असो, दत्ता सामंत प्रणित गिरणी कामगार संप असो किंवा पंजाब, आसाम आणि मिझोराम विषयक ऐतिहासिक करार असोत; अशा अनेकविध प्रसंगांत उद्‌भवलेली आव्हाने आणि आलेले अनुभव आदी कित्येक घडामोडींचा तपशील प्रधान यांनी तटस्थपणे मांडला आहे.'[७] यावरून ऐतिहासिक दृष्टीनेही प्रशासकीय क्षेत्रातील आत्मचरित्रे ही अत्यंत उपयुक्त ठरतात.

प्रशासकीय कार्याचे क्षेत्र हे चोवीस तास कर्तव्याचे असते. सतत फाईलमध्ये डोकावलेले, स्वाक्षऱ्यांवर स्वाक्षरी यांमध्ये गुंतलेले, कधी कार्यालयात तर कधी क्षेत्रीय कार्यात गुंतलेले, लाल दिव्याच्या गाडीत रुबाबात असलेले. असे असले तरी फायलिंगमध्ये डोकावतानाही या क्षेत्रातील व्यक्ती कथा-काव्यांमध्ये गुंतलेल्या दिसतात. प्रशासकीय कामात असताना त्यातील साहित्यिक डोकावतो. ज्ञानेश्वर मुळें बाबत दीपा देशमुख म्हणतात, 'डॉ. ज्ञानेश्वर मुळे दिल्ली इथल्या विदेश मंत्रालयात सचिव म्हणून कार्यरत आहेत. ते एक लेखक आहेत. कवी आहेत, स्तंभलेखक आहेत.'[८] यावरून प्रशासक असले तरी साहित्यिक म्हणूनही काही अधिकारी प्रसिद्ध आहेत. यामध्ये प्रामुख्याने सेतुमाधवराव पगडी यांनी मराठीत ५६ व इंग्रजीत १४ पुस्तके लिहिली आहेत. संगीता धायगुडे यांचाही उल्लेख साहित्यिक म्हणून येतो. त्यांनी 'प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार' हा काव्यसंग्रह लिहिला आहे. भुजंगराव कुलकर्णी यांनी 'मराठवाड्याचा विकास - अभ्यास व चिंतन' हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिलेला आहे. तसेच इ. झेड. खोब्रागडे यांनी 'प्रशासनातील समाजशास्त्र' या ग्रंथाचे लेखन केले आहे. थोडक्यात केंद्र आणि राज्याचे प्रशासन संभाळत साहित्य निर्मितीही करता येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वरील प्रशासकीय क्षेत्रातील अधिकारी होय.

## निष्कर्ष

सामाजिक, राजकीय, औद्योगिक, वैद्यकीय, शैक्षणिक, साहित्यिक आणि कला क्षेत्रातील आत्मचरित्रांसोबतच प्रशासकीय क्षेत्रातील मराठी आत्मचरित्र लेखनाचा एक स्वतंत्र प्रवाह मराठी साहित्यात निर्माण होत आहे. या आत्मचरित्रांमधून प्रामुख्याने लेखक म्हणून त्यांच्या जीवनातील संघर्ष येतो.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad